जा.क्र./नांवाशमनपा/साबांवि/14916/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
**दिनांक :- 09.01.2018**

# नि वि दा सु च ना क्र. ( 11) 2017-18

खालील कामामध्ये बी-1 प्रपत्रात मोहरबंद निविदा मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महाराष्ट्र शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन निविदा मागवित आहोत. खालील कामाची कोरी निविदा कार्यकारी अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड व लेखाधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या कार्यालयात **सकाळी 11.00 ते दुपारी 14.00** वाजेपर्यंत **दि. 09.01.2018 ते दि. 18.01.2018** या कालावधीत सुटटीचे दिवस वगळून को-या निविदा किंमत भरलेला अर्ज सादर केल्यानंतर देण्यात येतील. विहीत मुदतीनंतर निविदेची किंमत भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम **दि 20.01.2018 रोजी दुपारी 14.00** वाजेपर्यंत राहील शक्य झाल्यास प्राप्त निविदा त्याच दिवशी उघडण्यात येईल. नियम व अटी कार्यालयात व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड च्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा किंमत | इसारा रक्कम १ % | को-या निवीदेची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दितील प्रभाग क्र. १२ मधील विविध भागात जसे १) बागवान कॉलनी २) हिलाल नगर ३) हमीदीया कॉलनी ४) मोहमदिया कॉलनी ५) हबीबीया कॉलनी ६) पाकीजा नगर ७) उमर कॉलनी भागात नाली दुरुस्ती करणे, स्लॅब दुरुस्ती करणे व खड्डे बुजविणे चे काम करणे. | 110366/- | 1104/- | 300/- | 3 महीणे |
| 2 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दितील प्रभाग क्र. १७ मधील वजीराबाद भागात व चिखलवाडी भागात नामफलक बसविणे. | 101300/- | 1013/- | 300/- | 3 महीणे |

नियम व अटी :-

१) कंत्राटदार कोरी निविदा प्रपत्रे विकत घेण्याकरीता करावयाच्या अर्जासोबत खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.

अ) महाराष्ट्र शासनाकडुन योग्य त्या वर्गात नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत राजपत्रीत अधिका-यांचे साक्षांकनासह सादर करणे आवश्यक आहे तसेच मुळ नोंदणी प्रमाणपत्र दाखविणे आवश्यक आहे.

ब)विक्रीकर कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र 11 (4) 1 ची सत्यप्रत राजपत्रीत अधिका-यांचे साक्षांकनासह सादर करणे आवश्यक आहे.

क)सिमेंट कॉंक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे असणे किंवा भाडे करारनामा मशिनरीच्या कागदपत्राचा पुरावा व इतर आवश्यक दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ड)डांबराच्या कामासाठी हॅटमिक्स प्लांट स्वत:च्या मालकीचा असणे गरजेचे आहे. किंवा भाडे तत्वावर घेतल्यास या बाबतचा करारनामा असणे आवश्यक आहे.

इ)विद्युत कामासाठी कंत्राटदारांनी विद्युत कंत्राटदारांशी करारनामा करुन, करारनामा व विद्युत कंत्राटदाचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

ई)कंत्राटदाराने EPF व ESI ची नोंदणीचे प्रमाणपत्र. तसेच (EMD) भरणा केलेली कागदपत्रो स्कॅन/छायाकिंत प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.

२)निविदा धारकाने ईसारा रक्कम शेडयुल बॅंकेच्या सिडीआर/एफडीआर स्वरुपात कार्यकारी अभियंता,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांचे नावे भरणे आवश्यक आहे.

३)निविदा पुस्तीकेतील सविस्तर सुचनेमधील अटीनुसार सर्व कागदपत्रे राजपत्रीत अधिका-यांचे साक्षांकनासह लखोटा क्र. 1 मध्ये ठेवण्यात यावी. भरलेली निविदा लखोटा क्र. 2 मध्ये ठेवण्यात यावी. लखोटा क्र. 1 व 2 हे लखोटा क्र. 3 मध्ये ठेवून त्यावर कामाचा उल्लेख करुन भरलेली निविदा सादर करावी. लखोटा क्र. 1 मधील सर्व अटी पुर्ण झाल्याची व सर्व कागदपत्रे हि निविदा शर्तीनुसार असल्याची खात्री झाल्यानंतरच लखोटा क्र. 2 उघडुन त्या निविदेचा विचार केला जाईल याची नोंद घ्यावी.

४)अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सा.बां. विभागाचा शासन निर्णय क्र. सीएटी 2017/ प्र.क्र.8/ इमा-2 दिनांक 12.04.2017 मधील मुद्दा क्र. 4.6 पान क्र. १४ नुसार DD/FDR/ बॅंकेची प्रतिपुर्ती हमी (बॅंक गॅरंटी) लिफाफा क्र. २ मध्ये सादर करणे अनिवार्य राहील.

५)कंत्राटदाराने कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर शासकिय विमा कंपनी कडुन विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.

६)कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

स्वा/-
कार्यकारी अभियंता, (सा. बा. वि.)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

प्रतिलीपी :-

1. नोटीस बोर्ड,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
2. ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

for
कार्यकारी अभियंता, (सा. बा. वि.)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड